# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/१०/२०२४ (सोमवार) दुपार


### पोस्टे मौदा अंतर्गत आगामी विधानसभा निवडणुक संबंधाने रूटमार्च

आगामी विधानसभा निवडणुक निर्भयतेने व शांततेत पार पाडून निवडणुक प्रक्रियेत कुठलाही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याबाबत सर्वसामान्य जनतेत विश्वास निर्माण करण्याच्या उद्देशाने दि. २८/१०/२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वा. ते ०६.३० वा. दरम्यान मौदा शहरातील मुख्य बाजारपेठ, मिश्र वस्ती व मुख्य मार्गातुन रूट मार्च घेण्यात आला रूट मार्च मध्ये मा. डॉ. श्री. संतोष गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी, कामठी विभाग व श्री. प्रमोद घोंगे, पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे मौदा तसेच पोलीस ठाणे मौदा येथील ५ अधिकारी व ३० अंमलदार, केंद्रीय राखीव राखीव पोलीस दलाचे ०१ पथक यांनी सहभाग घेतला.

केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अधिकारी व अंमलदार यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांना निर्भयतेने मतदान करणेबाबत आवाहन केले निवडणूक कालावधी दरम्यान उद्‌भवनारी कुठलीही परिस्थिती हाताळण्यास नागपूर ग्रामीण व मौदा पोलीस सुसज्ज आहे. सर्व नागरिकांनी निर्भयपणे जास्तीत जास्त मतदान करावे असे मौदा पोलीसांकडून आवाहन करण्यात आले.





## प्राणांतिक अपघात

पोस्टे सावनेर अंतर्गत सद्भावना कॉलनी पाटनसावंगी एन.एच.–४७ रोड येथे फिर्यादी नामे– कु. सोनीया प्रकाश धुर्वे वय ३३ वर्ष रा. कवडस झोपडपटटी पाटनसावंगी ता.सावनेर जि. नागपुर याची आई **मृतक नामे– ताराबाई प्रकाश धुर्वे वय ५५ वर्ष रा. कवडस झोपडपटटी पाटनसावंगी ता.सावनेर जि.नागपुर** ही सावनेर नागपुर हायवे रोड अेलाडीत असता सावनेर कडुन नाागपुर कडे जाणारा लेनवर अज्ञात मोटरसायकलचे चालकाने आपले ताब्यातील मोटरसायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतक हीला मागुन धडक देवुन तिला गंभीर जख्मी करूण तिचे मरणात कारणीभुत झाला व तिला उपचारा करीता व अपघाताची माहीती न देता मोटरसायकल घेवुन नागपुरचे दिशेने पळुन गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे सावनेर येथे अज्ञात मोटरसायकल चालक आरोपीविरूद्ध कलम २८१, १०६, (२) भा.न्या.स.सह कलम १८४, १३४ (ब) मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अज्ञात आरोपीचा शोध सावनेर पोलीस घेत आहे.

## विनापरवाना फटाके बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे काटोल अंतर्गत दोडकीपुरा संतनगर काटोल येथे दि. २७/१०/२०२४ रोजी आरोपी नामे– मनिष उर्फ मनोज घनश्याम सांवल वय ४९ वर्ष रा मेन रोड धंतोली काटोल याने ११ विविध प्रकारचे फटाक्याचे बॉक्स किंमती ९८७४५ रू चे फटाके विनापरवाना विक्री करण्यासाठी साठवणुक करून स्फोटक पदार्थाचे बाबतीत हयगय कृत्य करून लोकांची सुरक्षितता धोक्यात आणून विनापरवाना बेकायदेशीररित्या सदर गोडावूनमध्ये ठेवल्याचे मिळून आल्याने सदर आरोपीविरूदध पोस्टे काटोल येथे कलम २८८, २२३, १२३ भा.न्यासं. सहकलम ९ (ब) स्फोटक पदार्थ अधि १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष ए पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण, मा. उपविभागिय पोलीस अधिकारी काटोल विभाग काटोल श्री. बापू रोहोम यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे काटोल येथील ठाणेदार पोनि निशांत मेश्राम, सपेनि नागवे व इतर स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर